MHYA030032982025

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २९.०५.२०२५ |
| नोंदणी दिनांक | : | २९.०५.२०२५ |
| निकाल तारीख | : | ११.११.२०२५ |
| कालावधी | : | **०० व. ०५ म. १३ दि.** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्रं. ५)यांचे न्यायालय, यवतमाळ.**
**(पिठासीन न्यायाधीश शेख एम.जे.एम.जे. )**

**न्यायनिर्णय**

(दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी पारीत)

**संक्षिप्त फौजदारी मामला क्रमांक २५९६/२०२५** **नि.क्र. ०८**
**अपराध क्रं.४९४/२०२५, पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर ता, जि. यवतमाळ**

| | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस निरीक्षक,<br>पोलीस स्टेशन, यवतमाळ शहर,<br>ता. जिल्हा यवतमाळ. |
| यांचे तर्फे | सहा. सरकारी अभियोक्ता:श्री.एस. व्ही मानकर |
| **आरोपी** | **कविश्वर सुर्यभान राउत,**<br>वय: ५२ वर्षे, धंदा - मजुरी,<br>रा. पाटीपुरा ता. जि. यवतमाळ. |
| यांचे तर्फे विधीज्ञ | श्री. लिहीतकर |
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २५.०४.२०२५ |
| एफ.आय.आर. दिनांक | २५.०४.२०२५ |
| दोषारोपपत्र दिनांक | २९.०५.२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०६.०८.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४.१०.२०२५ |
| ज्या दिनांकाला न्यायनिर्णय राखुन ठेवण्यात आला | - |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याची दिनांक | ११.११.२०२५ |
| शिक्षा झाल्याचा दिनांक | - |

## आरोपीची माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | आरोपीला जमानत झाल्याचा दिनांक | कलम व कायदा | आरोपी दोषी किंवा निर्दोष | शिक्षा झाल्याचा दिनांक | कलम ४२८, फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कविश्वर सुर्यभान राउत | अटक नाही. सुचनापत्रावर सोडण्यात आले. | - | महा. दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये दंडनिय अपराध | निर्दोष | - | - |

## अभियोग पक्षाचे / बचावपक्षाचे/न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्ष

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| सा.क्र.१ | उमेश राधेश्याम गुप्ता | साक्षीदार |

### ब. बचाव पक्ष

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

### क. न्यायालय

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

## अभियोगपक्षाचे / बचावपक्षाचे / न्यायालयाचे निशानी क्रमांकाची यादी

### अ. अभियोगपक्ष

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्रं.पी.०७/पी.डब्लु१ | जप्तीपंचणाम्यावरची सही |

### ब. बचावपक्ष

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

**क. न्यायालयाचे निशाणी क्रमांक**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

न्या य नि र्ण य

**(**घोषीत आज दिनांक ११ नोव्हेंबर**,** २०२५**)**

प्रस्तुतचा खटला आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये ठेवण्यात आलेल्या आरोपाकरीता चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन-**

**२.** दिनांक २५.०४.२०२५ रोजी फिर्यादी व इतर सहकारी प्रोव्हीबिशनकामी शासकीय वाहनाने परीसरात गस्त करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदाराकडून माहीती मिळाली की, आरोपी हा मौजा पाटीपुरा, यवतमाळ येथे गावठी हातभटटीची दारुची विक्री करत आहे. अशा माहीतीवरुन त्यांनी, पोलीस कर्मचारी पंचासह घटनास्थळी जावून छापा टाकला व आरोपीच्या ताब्यातुन किंमत रु. २४८०/- विदेशी दारुच्या बॉटल असा मुद्देमाल मिळाला. त्यावरुन सदरचा माल पंचासमक्ष जप्त करुन त्यापैकी प्रत्येकी एक १८० मि.ली. क्षमतेची बाटली सि.ए. तपासणी करीता नमुना वेगळा काढून जप्तीपंचनामा करण्यात आला. त्यावरुन फिर्यादी यांनी त्याच दिवशी आरोपीविरुध्द फिर्याद नोंदविली.

**३.** सदर फिर्यादवरुन आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा क्रमांक ४९४/२०२५ नोंद केला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा, जप्ती पत्रक तयार केले व आरोपीस अटक करुन अटक पंचनामा तयार केला व आरोपीस सुचनपत्रावर सोडले. तपासअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**४.** मी आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये दोषारोपाचे विवरण निशानी क्र. ०५ अन्वये निश्चीत करुन वाचून दाखविण्यात आले. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे प्रतिकथन केले व त्यांचेवर फौजदारी संपरीक्षा चालविण्याची विनंती केली. अभियोगपक्षातर्फे फक्त् एका साक्षीदाराचा पुरावा नोंदविण्यात आला.

**५.** विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षपुरावा व अभिलेखाचे अवलोकन केले.

**६.** अभियोगपक्षाचा पुरावा बघता, प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरीता माझ्या समक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थीत झाले असून त्यांचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेतः-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सरकारपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक २५.०४.२०२५ रोजी २१:०० ते २१:०० वाजताच्या दरम्यान मौजा पाटीपुरा, ता. व जि. यवतमाळ येथे आरोपीच्या ताब्यातुन किंमत रु. २४८०/- विदेशी दारुच्या बॉटल असा मुद्देमाल अवैधरित्या व विनापरवाना मिळून आला आणि आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदयाचे कलम ६५ (ई) चे उल्लंघन केले ? | नाही. |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली |

## कारणमिमांसा

<u>**मुद्दा क्र. १ व २ करिता -**</u>

**७.** आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्याकरीता सरकार पक्षाने साक्षीदार क्र.१ उमेश राधेश्याम गुप्ता यांना सरकारी पक्षाने जप्ती पंचनाम्यातील पंच म्हणून तपासण्यात आले. सदर पंचसाक्षीदारानी, दिनांक २५.०४.२०२५ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनाम्याकरीता कोठेही बोलाविले नव्हते, पोलीसांनी त्याचे समक्ष काहीही जप्त केले नाही असे कथन केले. सदर पंचानी जप्ती पंचनाम्यातील मजकूर माहीती नसल्याबाबत सांगीतले. सरकारी वकीलांनी घेतलेल्या उलटतपासात त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास कोणत्याही प्रकारे समर्थन केले नाही.

८. सदरच्या प्रकरणात सरकारी पक्षाने रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर आज पर्यंत दाखल केलेला नाही. तसेच जप्ती पंचनाम्यातील पंच साक्षीदारानी अभियोगपक्षास सहकार्य न केल्याने आरोपीच्या ताब्यातून नमुद मुद्देमाल जप्ती झाल्याचे सिध्द झाले नाही. त्याच्या परीणामी स्वरूप अभियोग पक्ष हा जप्ती पंचनामा सिध्द करण्यात सफल झाला नाही. करीता घटनेच्या वेळी दिनांक २५.०४.२०२५ रोजी २१:०० ते २१:०० वाजताच्या दरम्यान मौजा पाटीपुरा, ता. व जि. यवतमाळ येथे आरोपीच्या ताब्यातुन किंमत रु. २४८०/- विदेशी दारुच्या बॉटल असा मुद्देमाल असा मुद्देमाल अवैधरित्या व विनापरवाना मिळून आला त्यामुळे आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (ई) अंतर्गत शिक्षापात्र अपराध केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करू शकला नाही.

९. अभियोग पक्षाने तपासी अधिकाऱ्यास तपासले नाही त्यामुळे त्यांनी जप्त केलेल्या देशी दारुचा नमुना रासायनिक विश्लेषनाकरीता केव्हा पाठवीला याबाबद स्पष्टता होत नाही. तसेच सिलबंद करताना सर्व कायदेशीर आवशक तरतुदीचे पालन केले किंवा नाही हे अभिलेखावरुन स्पष्ट होत नाही. त्यामुळे जप्त केलेल्या देशी दारुचा नमुना रासायनीक परिक्षणाकरीता पाठवले व न आलेला अहवाल तो नेमका आरोपीच्या ताब्यातून जप्त करण्यात आलेल्या देशी दारु बाबतचा आहे हे सिध्द होत नाही.

१०. जप्त करण्यात आलेले द्रव्य हे गावठी हातभट्टीची दारु होते किंवा नव्हते हे सिध्द होण्याकरीता रासायनिक विश्लेषन अहवालाची मदत होते. पंचसाक्षीदाराचा मौखीक पुरावा अभिलेखावर उपलब्ध आहे. परंतु पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास मदत न केल्यामुळे त्याचा पुरावा ग्राहय धरता येणार नाही. आरोपी विरुध्दचा आरोप वाजवी संशयाच्या पलिकडे सिध्द करणे हे अभियोग पक्षाची जबाबदारी आहे. अभियोग पक्ष आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यास अयशस्वी झाले त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे.

११. थोडक्यात वरिल चर्चेअंती मी या निष्कर्षास आलो आहे की, आरोपी विरुध्द असलेला आरोप सिध्द होण्याकरीता पुरेसा विश्वसनिय पुरावा अभिलेखावर आलेला नाही. घटनेच्या दिवशी आरोपीकडून अनधीकृतपणे कोणते मादक द्रव्य आढळले हे अभियोग पक्षाने सबळ पूराव देवून सिध्द करु शकले नाही. आरोपी विरुध्द आरोप सिध्द झालेला नाही. वरिल

सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारआर्थी देत आहे व मुद्दा क्र.२ करिता खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१ आरोपी कविश्वर सुर्यभान राउत यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (ई) अंतर्गतच्या गुन्हयातून कलम २७८(१) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२ आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३ आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम ४८१ प्रमाणे १५००० रुपयांचे जमीन व वैयक्तिक बंधपत्र दयावे.

४ जप्त मुददेमाल अपील कालावधी नंतर पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामीण, यवतमाळ यांचेकडे पुढील विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावे.

५ न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.

Digitally signed by SHAIKH MOHD JUNED
Date: 2025.11.12 12:49:46 +0530

यवतमाळ
दिनांक- ११.११.२०२५

(शेख एम.जे. एम.जे.)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
(न्यायलय क्रं.५), यवतमाळ.